लातूर भूकंप
LATUR BHUKAMP
संपादक: अशोक चिंचोळे
सांज दैनिक : गुरूवार – ७ सप्टेंबर २०२३
वर्ष – ३७ वे
अंक – १५६
पाने – ४
E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822
epaper.dainikbhukamp.com
किंमत २ रूपये

लातूर - तिरुपती
श्री. बालाजी दर्शनासहित
A/C SLEEPER | AIR SUSPENSION
ऑगस्ट महिन्याचे वेळापत्रक
ऑगस्ट महिन्याच्या तारखा
दर मंगळवारी
1 8 22 29
दुपारी २.०० वा.
अधिक माहितीसाठी संपर्क
88888 50441
88888 45404
विश्व ट्रॅव्हल्स लातूर

## राज्य सरकारला झालाय 'धोरण लकवा'

# दुष्काळ, आरक्षण प्रश्नी तात्काळ अधिवेशन घ्या

**लातूर : पावसाअभावी राज्यात दुष्काळ परिस्थिती निर्माण झाली आहे. मात्र या सरकारला धोरण लकवा (पॉलीसी पॅरेलेसीस) झाला असून राज्य सरकारने दुष्काळ व आरक्षण प्रश्नावर तातडीने विधीमंडळाचे अधिवेशन बोलवावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकारी अध्यक्षा खा. सुप्रियाताई सुळे यांनी लातूर येथे पत्रकार परिषदेत केली आहे.**

### खा. सुप्रियाताई सुळे यांची लातुरात मागणी



पावसाअभावी राज्यात स्थिती गंभीर बनली आहे. अनेक गावात छावण्या, टँकरने पाणी पुरवठा करणे याची तातडीने गरज आहे. राज्यात दुष्काळ परिस्थिती निर्माण झाली आहे. तसेच राज्यात मराठाच नव्हे तर त्याबरोबर धनगर, मुस्लीम व लिंगायत यांच्या आरक्षणाचा प्रश्न असून दुष्काळ व आरक्षण प्रश्नावर राज्य सरकारने तातडीने विधीमंडळात सर्वपक्षीय आमदारांशी विचारविनीमय करून तोडगा काढावा अशी मागणी केली आहे.

महाराष्ट्र मराठा आरक्षणावरून पेटला असताना उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस हे 'लेह'ला जाऊन बसतात. याबाबत त्यांनी तीव्र नापसंती व्यक्त करून गृहमंत्री फडणवीस यांचे मंत्रालय मराठा आंदोलन प्रकरणी गृहविभागाचे अपयश आहे. परिस्थितीस गृहमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी जबाबदारी घेतली पाहिजे, असे मत व्यक्त केले. राज्यातील सरकारला पॉलीसी पॅरेलेसीस झाला आहे, अशा शब्दात टिका केली.

मराठवाड्यातील मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची सरकारने घोषणा केली म्हणजे आरक्षण प्रश्न मिटला का? असे विचारता खा. सुप्रियाताई सुळे हिच तर चर्चा विशेष अधिवेशनात करता आली असती. सर्व मराठ्यांना कुणबी प्रमाणप मिळणार का? तसे प्रमाणपत्र दिले तर सद्या असलेल्या ओबीसी प्रवर्गावर परिणाम होणार आदी प्रश्न दुष्काळ यावर विचारविनीमय करून निर्णय घेण्यासाठी विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलावून निर्णय घेतला पाहिजे असे मत व्यक्त केले. पवार साहेब राजकारणात मुलीपेक्षा, पुतण्यावर अधिक विसंबून राहिले का? या प्रश्नाला उत्तर देत असताना खा. सुळे यांनी मी कुटुंबात पवार साहेबांची मुलगी आहे पण राजकारणात ईतर कार्यकर्त्याप्रमाणे कार्यकर्ता आहे असे उत्तर दिले. सरकारला धोरणात्मक, दुष्काळ, आरक्षण, शिक्षणा संदर्भातचा लकवा मारला आहे, अशी टिका केली. केंद्र सरकारने संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले आहे. पण या अधिवेशनाचा अजेंडाच नाही. अजेंड्याशिवाय अधिवेशन हा काय प्रकार आहे? अशी चिंताही खा. सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केली. राष्ट्रवादीत फूट नाही, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष पवार साहेब अध्यक्ष, जयंत पाटील प्रदेशाध्यक्ष असल्याचे स्पष्ट केले.

या पत्रकार परिषदेस बसवराज पाटील नागराळकर, संजय शेटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे परळीचे बबनराव गित्ते, राजा मणियार आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## मराठा आरक्षणासाठी जिल्ह्यात शनिवारी शैक्षणीक बंद

लातूर : कोणत्याही अटी शर्ती न घालता मराठा समाजाला सरसकट कुणबी म्हणून आरक्षण द्यावे या मागणीसाठी मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने शनिवार, दि. ९ सप्टेंबर रोजी लातूर शहर व जिल्हयात शैक्षणिक बंद करण्यात येणार आहे. बुधवारी रात्री मोर्चाच्या वतीने येथे घेण्यात आलेल्या व्यापक बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

अंतरवाली सराटी येथे सुरू असलेल्या मराठा समाजाच्या उपोषण पार्श्वभूमिवर आरक्षणाबाबत समाजाची मते आजमावण्यासाठी व लढ्याची पुढील दिशा ठरवण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी समाजबांधवानी आपापली मते मांडली. सरकार ज्यांच्याकडे निजामकालीन पुरावे असतील त्याच मराठयांना कुणबी जातीचा दाखला देणार असल्याचे सांगत आहे तथापि हे योग्य व आपणास मान्य नसून सर्व मराठ्यांना ते सरसकट देण्यात यावे , असा ठरावच या बैठकीत घेण्यात आला. निजाम राजवटीत अनेकांनी अशा नोंदी केल्या नाहीत मराठा समाजातील ज्या कोणी केल्या असतील त्या सर्व समाजासाठी ग्राह्य मानणे न्यायाचे होईल त्यामुळे सरकारने आता वेळकाढूपणा व धरसोड वृत्ती टाळावी व सरसकट मराठयांना कुणबी जात प्रमाणपत्र द्यावे असे सर्वांनीच सांगितले. दरम्यान या मागणीकडे लक्ष वेधून ती मार्गी लावण्यासाठी आंदोलनाचा एक भाग म्हणून शनिवारी बंद पुकारण्यात आला आहे. विशेष म्हणजे विद्यार्थी- पालकांना त्रास व शाळा व्यवस्थापनाची कसरत होऊ नये म्हणून या नियोजीत बंद बाबत गुरूवारी शहरातील सर्व शाळा-महाविद्यालयाना तसेच विद्यार्थी वाहतुक संघटनेस पत्र देण्यात आली असून बंदसाठी सहकार्य करावे व या दिवशी चाचणी अथवा तत्सम परीक्षा असल्यास त्या पुढे ढकलाव्यात अशी विनंती मोर्चाच्या वतीने करण्यात आली आहे.

मराठा आरक्षण मागणीसाठी येथील तहसिल कार्यालयासमोर साखळी उपोषण करण्यात येत असून बुधवारी आदित्य देशमुख व सतिश कारंडे यांच्या उपोषणाने त्यास सुरुवात झाली आहे. पुढे मराठा समाजातील युवक त्यात साखळीपध्दतीने सामिल होतील. तालुका स्तरावरही अशी उषोषणे होत आहेत.

## पुण्यात धनगर जागृती परिषद

लातूर : पुणे येथे ४ थी राज्यस्तरीय धनगर जागृती परिषद १९ सप्टेंबर रोजी आयोजीत करण्यात आली असून वामन मेश्राम यांच्या अध्यक्षतेत होणाऱ्या या परिषदेचे उद्घाटन गणेश हाके पाटील हे करणार आहेत.

महापुरूष जीवन संदेश अभियान व सामाजीक नेटवर्किंगच्या अंतर्गत आचार्य प्र. के. अत्रे रंगमंदीर संत तुकाराम नगर पिंपरी येथे मंगळवार १९ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत धनगर परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेस माजी मंत्री दत्ता मामा भरणे, माजी मंत्री आ. राम शिंदे, महादेव जानकर, माजी आ. नारायण पाटील आदींसह अन्य मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या परिषदेस राज्यातील समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन चंद्रसेन लहाडे, प्रताप पाटील, प्रमोदिनी मुंदाने, बन्सीलाल भागवत, अॅड. प्रथमेश ठोंबरे यांनी केले आहे.



### माजी मंत्री आ. निलंगेकर यांच्याकडून गायकवाड कुटुंबियांचे सांत्वन

अॅग्रोटेक या कंपनीचे कार्यकारी संचालक अनंत गायकवाड यांचे वडील दिगंबरराव गायकवाड हलगरकर यांचे नुकतेच निधन झाले. त्यानंतर माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी गायकवाड कुटुंबियांच्या लातूर येथील निवासस्थानी जाऊन गायकवाड कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी गायकवाड परिवार व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात येईल अशी सुधारणा करा

जालना : राज्य सरकारने वंशावळीचे दस्ताऐवज असतील तर याऐवजी सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात येईल, अशी जी. आर. मध्ये सुधारणा करावी, अशी मागणी करून आपले आंदोलन चालूच राहील अशी भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी आज स्पष्ट केली आहे.

मराठा समाजातील ज्या व्यक्तींची कुणबी अशी निजामकालीन नोंद असेल, त्यांना इतर मागास प्रवर्गातील (कुणबी) दाखले दिले जातील, असे सरकारने म्हटले होते. सरकारचा हा निर्णय चांगला आहे. मराठा समाज या निर्णयाचे स्वागत करतो. वंशावळीचे पेपर असतील तर सरकार कार्यालयात जाऊन कुणबी प्रमाणपत्र मिळवा येईल. मात्र, आमच्याकडे कोणाकडेच वंशावळीचे दस्ताऐवज नाहीत. त्यामुळे आम्हाला सरकारच्या निर्णयाचा एक टक्काही फायदा नाही. त्यामुळे सरकारने आपल्या अधिसूचनेत एक लहानसा बदल करावा. 'वंशावळीचे दस्तावेज असतील तर' याऐवजी 'सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात येईल', एवढी सुधारणा करुन सरकारने नव्याने जीआर प्रसिद्ध करावा. त्यासाठी आम्ही राज्य सरकारला एक ते दोन दिवसांचा अवधी देऊ. तोपर्यंत आमचे आंदोलन सुरुच राहील, असे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले.

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी किमान निर्णय घेण्याचे धाडस दाखवले. त्यामुळे किमान मराठा समाजाला आरक्षण मिळण्याची प्रक्रिया सुरु झाली. त्यामुळे आम्ही सरकारच्या निर्णयाचे स्वागत करतो. पण वंशावळीचे दस्ताऐवज नसल्याने आम्हाला निर्णयाचा फायदा होणार नाही. आम्हाला सरकारची अडवणूक करायची नाही. आमची अडचण समजून घ्या. आमची अडवणूक प्रशासनच करत आहे. आमचं एवढंच म्हणणं आहे की, निर्णयात थोडी सुधारणा करा, असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला केले. आता यावर राज्य सरकारच्यावतीने काय भूमिका घेतली जाते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

बाकी सरकारने काल घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे. सरकारने आमची फसवणूक केली, असे आम्ही म्हणणार नाही. आम्ही तुमच्या निर्णयाचा सन्मान करतो, फक्त त्यामध्ये सुधारणा करावी. आपलं आंदोलन हे पुढे सुरु राहील. मी सरकारच्या सांगण्यावरुन सलाईन लावून घेतली, पाणी घेतले. सरकारने आमच्याविषयी काहीही मनात धरण्याची आवश्यकता नाही. मी मराठा समाजासाठी काहीही सहन करायला तयार आहे. फक्त सरकारने जीआरमध्ये सुधारणा करुन सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र द्यावे. सरकारने ही सुधारणा केली तरच मराठ्यांचा १०० टक्के विजय झाला, असे म्हणता येईल. गेल्या ७० वर्षांमध्य कोणत्याही सरकारने केलं नाही ते तुम्ही केलं, असं आम्ही म्हणू, असे जरांगे-पाटील यांनी सांगितले.

### हॉटेल चालवू देण्यासाठी खंडणीची मागणी

उदगीर : उदगीर येथील ७/१२ बार हे हॉटेल चालवू देण्यासाठी ५० हजार रूपयांची खंडणी मागितल्या प्रकरणी उदगीर ग्रामीण पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विमलबाई बाबुराव कांबळे रा. येणकी-मानकी रोड उदगीर या ७/१२ बार हे हॉटेल चालवितात. त्यांना बालाजी लक्ष्मण भोसले रा. संतोषीमाता नगर उदगीर यांनी ५ सप्टेंबर रोजी येऊन हॉटेल चालू द्यायचे असेल तर ५० हजार रूपये द्या अन्यथा बार कसे चालवता. तुम्ही येथे कसे राहता असे म्हणून धमकी दिली. या तक्रारीवरून उदगीर ग्रामीण पोलिसांत खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### भारनियमनाची शक्यता

मुंबई : पावसाची दडी, वाढते तापमान यात विजेची मागणी वाढली असून विजेचा प्रश्न सोडविण्यासाठी पुन्हा भारनियमन होण्याची शक्यता असून केंद्रीय वीज मंत्रालयाने सर्व वीज निर्मिती कंपन्यांना सुचना दिल्याचे वृत्त आहे. यासाठी राज्य सरकार वीज निर्मिती कंपन्या, खासगी वीज कंपन्या यांच्याशी केंद्रीय वीज मंत्रालय संपर्कात आहे.

## कृषि शिक्षणातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडतो : डॉ.बाबासाहेब ठोंबरे

लातूर : डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्त शिक्षक दिन साजरा करण्यात येतो. आयुष्यात सुरुवातीला आई शिक्षक स्वरुपात मुलाला शिकवते. शालेय व महाविद्यालयीन जीवनातील शिक्षकांच्या शिकवणुकीमुळे तो पुढील जीवनात यशस्वी होतो. सर्व गुरुजनांप्रति आदर व्यक्त करण्याचा हा दिवस. याच महन्मंगल दिनाचे औचित्य साधून दि: ०५ सप्टेंबर २०२३ रोजी कृषि महाविद्यालय, लातूर येथे शिक्षक दिन व नूतन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी अभिमुखता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे, प्रमुख मार्गदर्शक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य मधुकर गायकवाड, तर प्रमुख अतिथी म्हणून, विदेकृजै महाविद्यालय, लातूरचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.जगदीश जहागीरदार, पकृव्यव्य. संस्था, चाकूरचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, डॉ.रणजीत चव्हाण, डॉ. विश्वनाथ कांबळे, डॉ. दिनेशसिंह चौहान हे होते.

अध्यक्षीय समारोपात डॉ. बाबासाहेब ठोंबरे म्हणाले, शिस्तप्रिय विद्यार्थी घडविण्यासाठी कृषि महाविद्यालय तत्पर आहे. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व खुलून दिसण्यासाठी त्यांनी भाषेवर प्रभुत्व मिळविणे आवश्यक आहे. या कृषि महाविद्यालयात अंगभूत कलागुणांना पैलू पाडण्याचे कार्य अहोरात्र केले जाते. श्रद्धावान लभते ज्ञानम् असे गीतेत म्हटले आहे. म्हणून विद्यार्थ्यांनी गुरूंवर नितांत श्रद्धा ठेवून त्यांच्याकडून अधिकाधिक ज्ञान ग्रहण केले पाहिजे. कृषि शिक्षणातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडतो असेही ते म्हणाले. या प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य गायकवाड म्हणाले, शिक्षण अंध:कारातून प्रकाशाकडे जाण्याचा मार्ग दाखवतो व चुकीच्या रूढी - परंपरेतून माणसाला मुक्त करते. तसेच राष्ट्र निर्माणात शिक्षकांचे योगदान सर्वोच्च आहे असेही ते म्हणाले. यानंतर पालक प्रतिनिधि मनोगत व्यक्त केले. सौ. अश्रिवनी लाकाळ यांनी या महाविद्यालयात विद्यार्थी शिकून देशासाठी आदर्श बनतील असा विश्र्वास व्यक्त केला, तर श्री.दिलीप पांचाळ यांनी कृषि शिक्षण हे आजच्या नव युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी उत्तम साधन असल्याचे नमूद केले. प्रमुख अतिथी डॉ.जहागीरदार म्हणाले की, कृषि शिक्षण घेताना सामाजिक बांधिलकी जपता येते, तर डॉ.रणजीत चव्हाण म्हणाले सशक्त विद्यार्थी व देश घडविण्यात महत्वाचे कार्य शिक्षक, महाविद्यालय व विद्यापीठ अविरत करत आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विठोबा मुळेकर यांनी तर सूत्रसंचालन डॉ. अनंत शिंदे यांनी केले व आभार प्रदर्शन डॉ. विनोद शिंदे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.व्यंकट जगताप, डॉ.राजेश शेळके, डॉ.पद्माकर वाडीकर, डॉ.सुनिता मगर, डॉ.प्रभाकर आडसूळ, डॉ.संघर्ष शृंगारे, श्री.भगवान कांबळे, श्री.प्रल्हाद जोंधळे, श्री.देविदास चामणीकर, श्री.पितांबर पिरंगे व इतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## गावठी कट्टा, काडतूस, पाच दुचाकीसह एमआयडीसी पोलिसांकडून एकास अटक

लातूर : पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलिसांनी भामरी चौक येथून एका तरूणास अटक करून त्याच्याकडून एक गावठी कट्टा, जिवंत काडतूस, पाच मोटारसायकली असा एकूण २ लाख ९६ हजार रूपयांचा ऐवज जप्त केला आहे.

अरूण रणजीतसिंह जमादार (वय २२) रा. शिवणखेड (खु.) ता. अहमदपूर असे अटक करणयत आलेल्या तरूणाचे नाव असून त्याच्याकडूंन चोरीची बुलेट, चार मोटारसायकल जप्त करण्यात आल्या आहेत.

लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्या इसमावर कारवाई करण्याबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे स्तरावर विशेष पथके नेमून कार्यवाही करण्यात येत होती. उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर शहर भागवत



फुंदे यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे एमआयडीसी पोलीस निरीक्षक गोरख दिवे यांच्या नेतृत्वात विशेष पथकाने ४ सप्टेबर रोजी मध्यरात्री बांभरी चौक, बायपास रोड येथून लातूर एका इसमास ताब्यात घेतले.

याप्रकरणी पोलिस अमलदार अर्जुनसिंग राजपूत यांच्या फिर्यादीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे गुन्हा रजिस्टर नंबर ६६१/२०२३ कलम ३ (२५) भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद झालेला असून एमआयडीसी पोलिस पुढील तपास करीत असताना त्याच्या ताब्यातील मोटरसायकल पोलीस ठाणे एमआयडीसी येथे दाखल असलेल्या चोरीच्या गुन्ह्यातील असल्याचे समोर आले. त्याविषयी अधिक तपास करून नमूद आरोपीने विविध ठिकाणाहून चोरलेल्या एकूण पाच मोटारसायकली जप्त करण्यात आले असून यामध्ये पोलीस ठाणे शिवाजीनगर व रेणापूर येथे प्रत्येकी एक मोटरसायकलीचा गुन्हा दाखल आहे. इतर मोटार सायकल संदर्भात तपास सुरू आहे.

पोलीस ठाणे एमआयडीसी चे पोलीस निरीक्षक गोरख दिवे यांचे नेतृत्वात पोलीस पथकाने उत्कृष्ट कार्यवाही करत एक गावठी कट्टा जिवंत राऊंडसह व चोरीच्या पाच मोटरसायकली असा एकूण २ लाख ९६ हजार रुपयाचा मुद्देमाल नमूद आरोपीकडून जप्त केला आहे. तसेच मोटरसायकल चोरीचे तीन गुन्हे उघड केले आहेत.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे एमआयडीसीचे पोलीस निरीक्षक गोरख दिवे यांच्या नेतृत्वातील पथकामधील सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक डोके सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक भीमराव बेल्हाळे, पोलीस अंमलदार अर्जुन राजपूत, मयूर मुगळे, सचिन कांबळे, बळवंत भोसले, लोंढे, योगेश चिंचोलीकर यांनी केली आहे.

## शिक्षकांच्या सहाय्याने जिल्ह्यातील बालकांना कुपोषणमुक्त करणार-सीईओ राहुल गुप्ता

उस्मानाबाद : जिल्ह्यात कुपोषित बालकांचे प्रमाण दीड हजाराच्या जवळपास आहे. त्यामुळे या बालकांना कुपोषणमुक्त करुन त्यांचे आरोग्य सुदृढ बनविण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घेतला आहे. त्यामुळे शिक्षण विभाग आणि शिक्षकांच्या माध्यमातून संपूर्ण जिल्हा कुपोषणमुक्त करणार असल्याचे आश्वासन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गुप्ता यांनी बुधवारी दिले.

तुळजापूर तालुक्यातील सांगवी (काटी) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक तथा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य कार्यकारिणी सदस्य कल्याण बेताळे यांच्या पुढाकाराने सांगवी (काटी) गावातील १० कुपोषित बालकांना दत्तक घेण्यात आले आहे. या मुलांना पौष्टिक आहार किटचे वाटप श्री. गुप्ता यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी देवदत्त गिरी, सरपंच अमोल पाटील, उपसरपंच रामदास मगर, गटशिक्षणाधिकारी मेहरुन्निसा इनामदार, गटविकास अधिकारी ताकभाते, केंद्रप्रमुख तुकाराम क्षीरसागर, शालेय समितीचे अध्यक्ष संतोष मगर, शिक्षक समितीचे तालुकाध्यक्ष मनोज पाटील, अंगणवाडी पर्यवेक्षिका स्मिता घोडके, बालविकास प्रकल्प अधिकारी गोरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना गुप्ता म्हणाले की, जिल्ह्यात अतिकुपोषित व कुपोषित बालकांची संख्या १४५५ आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. सुदृढ बालक, सुदृढ देश यासाठी सर्व बालके शारीरिक व मानसिकदृष्ट्या सुदृढ व्हावीत म्हणून जिल्हा परिषदेच्या माध्यमातून उपक्रम राबविण्यात येत आहे. त्या उपक्रमास महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने हातभार लावला आहे. जिल्ह्यातील प्रत्येक जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक संबंधित गावातील कुपोषित बालकांना दत्तक घेऊन त्यांना वर्षभर पौष्टिक आहाराचा पुरवठा करणार आहेत. तसेच पालकांनी देखील आपल्याकडे असलेल्या गहू, ज्वारी, तूरडाळ, मूगडाळ, उडीद डाळ आदीसह इतर पौष्टिक पदार्थांचे पोषण बालकांना देण्यासाठी विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासूनच पाठ्यपुस्तकांबरोबरच अवांतर पुस्तकांचे वाचन करावे. त्यामुळे जगामध्ये काय घडामोडी सुरू आहेत याची आपल्या ज्ञानात भर पडते. विशेष म्हणजे वाचनातून अनुभव कथन लिहिण्याचे प्रमाण बंद झाले असून ते सुरू करण्यासाठी जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांनी दर शनिवारी विद्यार्थ्यांकडून अनुभव कथन लिहून घ्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. प्रास्ताविकात मुख्याध्यापक कल्याण बेताळे म्हणाले की, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.गुप्ता यांनी ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून शिक्षकांचे केंद्र, तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्याची पायपीट थांबवून अतिरिक्त ताण कमी केला आहे. त्यामुळे आमचेदेखील समाजाप्रती उत्तरदायित्व असल्यामुळे प्रत्येक गावातील कुपोषित बालकांना दत्तक घेऊन त्यांना सुदृढ केले तर ते जिल्हा परिषदेच्या शाळेत येतील व हेच सुदृढ बालक उद्याचे भविष्य असल्यामुळे गावकऱ्यांनी देखील या उपक्रमास सहकार्य करावे, असे आवाहन केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात एकल पालक असलेल्या विद्यार्थ्यांना जेवणाचा डबा व पाण्याच्या बाटलीचे वाटप करण्यात आले. तर दहा कुपोषित बालकांना पोषण आहार किटचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमासाठी शिक्षक संजय चौधरी, अमोल कविटकर, ज्योतीबा जाधव, शारदा महिंद्रकर, रोहिणी कापसे, तुकाराम वाडकर, अंगणवाडी सेविका पुष्पा मगर व इतरांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका जयमाला वडणे यांनी केले. आभार संजय चौधरी यांनी मानले. यावेळी शिक्षक, पालक, विद्यार्थी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जनावरांसाठी पाणी आणि चाऱ्याची सोय, पर्यायी व्यवस्थेसाठी अचुक नियोजन करा-सचिन ओंम्बासे

उस्मानाबाद : पाणीसाठाच्या स्त्रोतांमध्ये उपलब्ध असलेल्या पाणीसाठा आणि जनावरांसाठी पिण्याच्या पाणी , चारा किती प्रमाणात उपलब्ध आहे.किती दिवस चालणार तसेच हा पाणी आणि चारा संपल्यानंतर याबाबत पर्यायी व्यवस्था कशा प्रकारे करता येईल, ग्रामीण भागात जनावरांसाठी पाणी आणि चाऱ्याची सोय कशी करावी याबाबत अचूक नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंम्बासे यांनी दिले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गुप्ता, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कामत, अप्पर जिल्हा अधिकारी शिवाजी शिंदे, निवासी उपजिल्हाधिकारी महेंद्र कुमार कांबळे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी रविंद्र माने, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. यतीन पुजारी उपस्थित होते.

उस्मानाबाद जिल्ह्यात पावसाने हजेरी न लावल्याने निर्माण झालेली दुष्काळ सदृश्य परिस्थिती यावर नियंत्रण मिळविणे तसेच या काळात शेतकऱ्यांना दिलासा देणे, पिण्याच्या पाण्याचे व उच्च जनावरांच्या चाऱ्याचे अधिनियम करणे. या संदर्भात आज जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.

जिल्हाधिकारी पुढे म्हणाले की, प्रत्येक गावातील अचुक सर्वेक्षण करुन छोटया व मोठया जनावरांची संख्या मोजावी व त्यांना आवश्यक असलेल्या पाणी व चारा याबाबत नियोजन करावे.तसचे आवश्यक असल्यास विहिरींचे अधिग्रहण सुरु करावे व टँकरने पाणी पुरवठयासाठी फिलिंग पाणी भरणा केंद्र दुरुस्त करुन घ्यावे.

## उमरगाच्या शिबिरात भटके विमुक्त समाजातील नागरिकांना मिळाला विविध योजनांचा लाभ

उस्मानाबाद : जिल्हाधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली आज ५ सप्टेबर रोजी चिंचोळे मंगल कार्यालय,त्रिकोळी रोड उमरगा येथे भटके विमुक्त समाजातील नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी शासन आपल्या दारी या उपक्रमाअंतर्गत शिबीराचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उमरगा तहसीलदार गोविंद येरमे होते. प्रमुख पाहुणे म्हणून मसणजोगी समाजाचे प्रतिनिधी संजीव विभूते,आदर्श महाविद्यालयाचे प्रा.शौकत पटे व प्रा. ए.सी.गायकवाड उपस्थित होते. प्रास्ताविक नायब तहसीलदार राजाराम केलूरकर यांनी केले.या शिबीरात भटके विमुक्त समाजातील नागरिकांना संजय गांधी योजना, नवीन राशनकार्ड देणे,राशनकार्डाची दुय्यम प्रत देणे,राशनकार्डची फोड करून देणे,नवीन मतदार नोंदणी करणे,आधारकार्ड नोंदणी करणे आदी.योजनांचा लाभ देण्यात आला. या शिबीरात २५० भटके विमुक्त नागरिकांनी सहभाग नोंदविला. शिबीरासाठी चिंचोळे आप्पा यांनी चिंचोळे मंगल कार्यालय उपलब्ध करून दिले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सुहास जेवळीकर मंडळ अधिकारी उमरगा श्री शिवराज खुर्दे, तलाठी उमरगा, पुरवठा व निवडणुक विभागातील कर्मचारी तसेच बाबु मुळे,विश्वनाथ मुळे, आंबोजी विभूते व शंकर विभुते या भटके विमुक्त समाजबांधवांनी सहकार्य केले.

# सोन्याची द्वारका खरंच अस्तित्वात होती? समुद्रात सापडलेल्या 'या' गोष्टींमुळे उलगडलं कोणतं रहस्य?

गुजरातच्या द्वारका जिल्ह्यात पश्चिमेकडील समुद्रकिनाऱ्यावर वसलेली द्वारकानगरी कोट्यवधी हिंदूंचे पवित्र स्थान म्हणून ओळखली जाते.

भारताच्या सांस्कृतिक इतिहासात आणि हिंदू धर्माच्या पुस्तकांमध्येही द्वारकेचा उल्लेख श्रीकृष्णाने वसवलेलं शहर असा केला गेलाय. त्यामुळे हे अनेकांचे श्रद्धास्थान आहेच, पण यासोबतच द्वारकेच्या समुद्रात पुरातत्व विभागामार्फत केल्या जाणाऱ्या संशोधनामुळेही देशविदेशातील अनेकांना द्वारका आकर्षित करते आहे.

द्वारकेतील जमीन आणि समुद्रात संशोधन आणि उत्खननादरम्यान सापडलेल्या अवशेषांमुळे या ठिकाणी प्राचीन काळी असणाऱ्या शहराचे पुरावे मिळत आहेत.

येथे सापडलेले अवशेष हेच सांगतात की, इथे विविध आकारांची आणि मापाची जहाजे येथे येत असत आणि परदेशात जात असत.

कालांतराने हे बंदर नष्ट केलं गेलं आणि आता शास्त्रज्ञांना पुन्हा एकदा द्वारका नष्ट होईल की काय अशी भीती वाटू लागलीये.

हिंदू धर्मातील मान्यतेनुसार भगवान विष्णूचा आठवा अवतार मानल्या जाणाऱ्या श्रीकृष्णाने त्यांच्या कंस मामाचा वध करून लोकांना त्याच्या अत्याचारापासून मुक्त केलं आणि भगवान श्रीकृष्ण द्वारकेत राहू लागले.

'श्रीमद्भगवद्गीता' आणि 'महाभारत' या महाकाव्यानुसार, श्रीकृष्णाने कंसाचा वध केल्याने मगधचा राजा जरासंध संतप्त झाला. कारण जरासंधाच्या दोन मुली, अस्ति आणि प्रक्षी या कंसाच्या पत्नी होत्या.

मगधचा राजा जरासंधाने तब्बल १७ वेळा मथुरेवर आक्रमण केलं. भगवान श्रीकृष्ण आणि त्यांचा भाऊ बलराम यांनी मिळून मथुरेचं रक्षण केलं.

पण १८ व्या वेळी मथुरेचं पतन दिसू लागलं तेव्हा श्रीकृष्णांनी यादवांना कालयवन नावाच्या सेनापतीच्या नेतृत्वाखाली मगधमधून बाहेर काढण्याचा निर्णय घेतला. मथुरेच्या लोकांना भगवान श्रीकृष्णांनी द्वारकेत आणून वसवलं.

मगध सैन्याने मथुरा जाळली. त्या आगीत यादव, कृष्ण आणि बलरामांचा नाश झाला, असं जरसंघाला वाटत होतं, पण हा त्याचा भ्रम होता.

'श्रीमद्भागवत महापुराण', 'विष्णुपुराण' आणि महाभारतातल्या मौसलपर्वात उल्लेख केल्याप्रमाणे श्रीकृष्णाने समुद्रातून दर्यादेवांकडे १२ योजनांची जमीन मागितली.

देवांचे शिल्पकार विश्र्वकर्मा यांनी ही नगरी वसवली. त्यांनी कृष्णाच्या १६ हजार १०८ पत्नींसाठी महाल आणि नगरवासीयांसाठी निवासस्थाने बांधली.

द्वारकेच्या बेटावर एक किल्ला बांधण्यात आला आणि या नगरात राहणाऱ्या लोकांना ओळखता यावं म्हणून एक विशेष खूण बनवण्यात आली जी द्वारकावासीयांना नेहमी त्यांच्या मानेभोवती गुंडाळावी लागायची.

### या द्वारकेला 'सुवर्णनगरी' हे नाव पडलं.

'श्रीमद्भागवत महापुराण' मध्ये नमूद केल्याप्रमाणे पृथ्वीवर १२५ वर्ष राज्य केल्यानंतर कृष्ण वैकुंठवासी झाले. त्यानंतर श्रीकृष्णाचा महाल सोडून समुद्राने सर्व जमीन परत घेतली.

स्थानिकांचं असं म्हणणं आहे की, आजपर्यंत तब्बल सहावेळा द्वारका समुद्रात बुडाली आहे.

आठव्या शतकात आदी शंकराचार्यांनी उत्तरेला बद्रिकाश्रम ज्योतीपीठ (बद्रीनाथ, उत्तराखंड), पश्र्चिमेला शारदापीठ (द्वारका, गुजरात), पूर्वेला गोवर्धनपीठ (पुरी, ओडिशा) आणि दक्षिणेला शृंगेरी शारदापीठ (चिकमंगळूर, कर्नाटक) स्थापन केले.

यानंतर द्वारकेचं धार्मिक महत्त्व वाढलं. त्यांनी द्वारकेच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला असे मानले जाते.

मंदिर आणि स्थानिकांनी मध्ययुगीन काळात अनेक चढउतार पाहिले आहेत आणि त्यानंतरही परदेशातील हिंदूंच्या मनात द्वारकेचं महत्व अनन्यसाधारण आहे.

### द्वारकेत झालेलं संशोधन, उत्खनन, संवर्धन

सध्या द्वारका, बेट द्वारका, प्रभास-पाटणजवळ असणारी द्वारका आणि पोरबंदर आणि मियाणी यांच्यामध्ये असणाऱ्या द्वारकेत उत्खनन सुरु आहे. पुराणात दिलेल्या माहितीनुसार द्वारकेला रैवतक पर्वताने वेढले होते.

सध्याच्या द्वारकेच्या परिसरात डोंगर नसल्यामुळे काही इतिहासकार आणि संशोधकांनी सध्याची द्वारका नगरी ही प्राचीन नगरी नसल्याचं मत मांडलं आहे.

मात्र आजपर्यंत द्वारका आणि बेट द्वारका येथे झालेल्या बहुतेक संशोधन-उत्खननाचे सकारात्मक परिणाम मिळाले आहेत.

१९६०-७० च्या दशकात, द्वारका येथे जमिनीवर सापडलेल्या प्राचीन अवशेषांमुळे, पुरातत्वशास्त्रज्ञांनी समुद्रात उत्खनन करण्याचा निर्णय घेतला होता.

त्यावेळी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (ASI) मध्ये सागरी अभ्यासासाठीची शाखा अस्तित्वात नव्हती. प्रसिद्ध पुरातत्वशास्त्रज्ञ एस.आर. राव यांनी गोवा येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशनोग्राफीच्या मदतीने समुद्रनारायण मंदिराच्या पलीकडे संशोधन सुरु केलं.

मेहरामनच्या तळाशी तीन ते १० मीटर खोलीवर, समुद्रातील वनस्पती आणि वाळू हटवल्यानंतर आयताकृती आणि अर्धगोलाकार आकाराचे दगड सापडले.

या दगडांचा आकार नैसर्गिक नव्हता. या दगडांवर छिन्नीचा वापर करून खाचा बनवल्या गेल्या होत्या. यामध्ये लाकडाचा भुसा करण्यासाठी किंवा मग हे दगड एकमेकांना जोडण्यासाठी या खाचांचा वापर केला जात असावा.

NIO ला या भागातून १२० नांगर मिळाले होते. जे चुनखडी, बुखारिया दगड, काळ्या दगडापासून बनवलेले होते.

या दगडांचे आकार वेगवेगळे असले तरी यामध्ये बनवण्यात आलेली छिद्रं मात्र एकसारखीच होती.

या दगडी नांगराचा आकार, परीघ आणि वजन यावर या नांगराचे वय किती आहे याचा अंदाज लावला जाऊ शकतो. जुन्या स्थानिक मच्छिमारांनी संशोधकांना सांगितलं की अशा प्रकारचे नांगर हे १९ व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत वापरले जात होते.

त्यामुळे हे नांगर कोणत्या काळातील आहेत हे ठरवण्यासाठी वेगवेगळा अभ्यास करण्यात आला. (Migration and



Diffusion, Volume 6, Issue 21, Page No. 56-74)

जहाज समुद्रात स्थिर ठेवण्यासाठी, माल चढवताना किंवा उतरवताना जहाजे नांगरून ठेवावी लागतात. हे नांगर जहाजाच्या प्रकारानुसार आणि वाहून नेण्याच्या क्षमतेनुसार वेगवेगळ्या आकाराचे किंवा वजनाचे असू शकतात.

संशोधकांना त्रिकोणी, इंडो-अरब शैलीतील आकृती किंवा गोलाकार नांगर सापडले आहेत. त्याचे वजन सुमारे ८५ किलोग्रॅम ते सुमारे ५०० किलोग्रॅम पर्यंत आहे.

समुद्राच्या तळातील दगडांमध्ये अडकल्याने, दोर तुटल्यामुळे हा नांगर तिथे पडला असावा, असं संशोधकांचं मत आहे. गोलाकार तटबंदीसारख्या आकारामुळे, संशोधकांनी सुचवले आहे की या वास्तू १२व्या किंवा १३ व्या शतकातील असाव्यात.

यापूर्वी बीबीसीशी बोलताना एएसआयचे अतिरिक्त महासंचालक आलोक त्रिपाठींनी म्हटलं होतं, समुद्रात सापडलेल्या जीवाश्मांच्या आधारे हे निश्र्चितपणे सांगितले जाऊ शकते की हे एक प्राचीन बंदर आहे.

आलोक त्रिपाठी यांनी २००७ मध्ये द्वारका समुद्र संशोधन मोहिमेचं नेतृत्वही केलेलं होतं.

पाण्याखालील गोष्टींचं संशोधन करणाऱ्या पुरातत्वशास्त्रज्ञांची अनुपलब्धता, मर्यादित संसाधनं आणि वर्षभरात केवळ दोन ते तीन महिन्यांचा संशोधन काळ यामुळं हे संशोधन अत्यंत संथ गतीने सुरु आहे.

### द्वारका, समुद्र आणि ग्रामीण भाग

द्वारकेचा समुद्रकिनारा हे मुंबई ते कराची, कच्छ ते मुंबई, गुजरात ते अरबस्तान आणि आफ्रिका या व्यापार मार्गावरील महत्त्वाचं स्थानक होतं.

मात्र, सुलतानी काळात कंपनी सरकार, ब्रिटिश सरकार आणि नंतर गायकवाड सरकारच्या काळात येथे समुद्री चाच्यांचे वास्तव्य होते. मोहम्मद बेगडा, कंपनी सरकार आणि नंतर इंग्रजांनी या चाच्यांना संपवण्यासाठी वेगवेगळ्या मोहिमा केल्या, अशी इतिहासात नोंद आहे.

आजही द्वारका व आसपासच्या गावात विशेष शेती केली जात नाही. त्यामुळे या बंदरामधून कृषी उत्पादनांसोबतच प्रवासी, मीठ आणि इतर मालाची तस्करी केली जात असावी असा अंदाज बांधता येतो.

कल्याणराय जोशी त्यांच्या 'द्वारका' या पुस्तकात (पान क्र.१२१-१२६) लिहितात की, इथली जमीन शेतीपूरक नसल्याने, वाणियांची किंवा पाटीदारांची विशेष लोकवस्ती इथे नाही.

मात्र, येथे भाटिया आणि लोहणा (ठक्कर) यांचे अस्तित्व आहे ज्यांनी सागरी व्यापार जोपासण्यासाठी इथे काम केलं होतं.

या दोन्ही समाजातील लोकांच्या अनेक पिढ्या इथे राहिल्या आहेत किंवा ते मुंबई, सुरत, कराची, कटक, बालासिनोर आणि पुणे येथे हे लोक स्थलांतरित झाले आहेत.

द्वारकेच्या व्यापाऱ्यांचे रंगून, अरेबिया, मस्कत, आफ्रिका आणि झांझिबार यांच्याशी व्यापारी संबंध असल्याचे पुरावे आढळतात.

मांडवी ते मुंबईपर्यंत जाणारी जहाजं द्वारकेला हमखास थांबत असत. याच स्थानकावरून बहुतांश लोक या जहाजामध्ये चढत किंवा उतरत असत.

### इतिहासाची पुनरावृत्ती का होते?

अनेक शतकांपूर्वी समुद्राच्या पाण्याची पातळी वाढल्याने द्वारका एकापेक्षा जास्त वेळा पाण्याखाली बुडाल्याचे वैज्ञानिक पुरावे आहेत. उडखठ-छखज चे माजी मुख्य शास्त्रज्ञ डॉ. राजीव निगम म्हणतात की,

सुमारे १५,००० हजार वर्षांपूर्वी समुद्राची पातळी आताच्या तुलनेत १०० मीटरने कमी होती. नंतर समुद्राची पातळी पुन्हा थोडी वाढली आणि ७,००० वर्षांपूर्वी ती आताच्यापेक्षाही जास्त होती.

त्यानंतर सुमारे ३५०० वर्षांपूर्वी ही पातळी पुन्हा खाली आली आणि त्याच सुमारास द्वारका शहराची स्थापना झाली. परंतु नंतर समुद्राची पातळी पुन्हा वाढू लागली आणि शहर बुडू लागले.

NIO च्या संशोधकांनी असा निष्कर्ष काढला की समुद्राची पातळी दरवर्षी चार मीटरने वाढत आहे. भूगर्भशास्त्रज्ञांच्या मते कच्छच्या रणामध्ये जमिनीची धूप होण्याची दाट शक्यता आहे.

सुमारे १७५ वर्षांपूर्वी, द्वारकेच्या उत्तरेला दोन किलोमीटर अंतरावर रुपेन नावाचे नवीन बंदर विकसित झाले, ज्यामुळे द्वारका बंदराचाही ऱ्हास झाला असावा असा अंदाज लावण्यात आला.

या बंदरामध्ये बोटी लाकडाच्या नांगराने रोवल्याची नांगरल्याच्या खुणा सापडतात. तिथे समुद्राच्या तळाशी द्वारकेसारख्याच दगडी रचनाही सापडली आहे.

नेचर कम्युनिकेशन जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार, सूरत, कच्छ, भावनगर आणि भरूच या भागावर परिणाम होऊ शकतो मात्र डावरी, हजीरा आणि कांडला यांच्यावर मात्र मोठा परिणाम होऊ शकतो.

जामनगर, देवभूमी द्वारका, पोरबंदर, जुनागढ, अमरेली, नवसारी, वलसाड आणि गिरसोमनाथला या भागावर मध्यम ते हलका परिणाम पडेल.

याशिवाय कच्छ पुन्हा एकदा बेट बनण्याची भीतीही या अहवालात व्यक्त करण्यात आली आहे.

# टाटांचे होणार हल्दीराम, रिलायन्सला टक्कर देण्यासाठी सुरू आहे या योजनेवर काम




लग्नाच्या चर्चेत टेबलवर दिलेले 'नमकीन' असो किंवा मित्रांच्या रात्रीच्या पार्ट्यांमध्ये खाल्लेला 'स्नॅक' असो, या दोन्ही ठिकाणी एका ब्रँडचे नाव बहुतेकांच्या जिभेवर असते, ते म्हणजे 'हल्दीराम'. अनेक वर्षांच्या विश्र्वासानंतर, आज हा भारतातील स्नॅक्सचा सर्वात मोठा ब्रँड बनला आहे. आता त्यात आणखी एक विश्र्वासाचे प्रतीक म्हणजे 'टाटा ग्रुप' जोडला जाऊ शकतो.

टाटा समूह स्नॅक्स ब्रँड हल्दीराममधील ५१ टक्के हिस्सा खरेदी करण्याच्या योजनेवर काम करत आहे. हा करार पूर्ण झाल्यास टाटा समूहाची किरकोळ बाजारात रिलायन्स रिटेल आणि पेप्सी सारख्या बड्या कंपन्यांशी थेट स्पर्धा होईल. मात्र, हल्दीरामच्या मूल्यांकनावर टाटा खूश नाहीत.

सूत्रांच्या हवाल्याने, रॉयटर्सने वृत्त दिले आहे की टाटा समूह हल्दीराम ब्रँडच्या १० अब्ज डॉलरच्या मूल्यांकनावर खूश नाही. दुसरीकडे, हल्दीराम १० टक्के स्टेक विकण्यासाठी दुसऱ्या गुंतवणूकदाराशी बोलणी करत आहेत. ही खाजगी इक्विटी फर्म बेन कॅपिटल आहे.

टाटा समूहाची टाटा कंझ्युमर प्रॉडक्ट्स कंपनी हल्दीरामच्या अधिग्रहणासाठी बोलणी करत आहे. टाटा समूहाची ही कंपनी यूकेच्या लोकप्रिय चहा-ब्रँड टेटलीच्या मालकीची आहे. हीच कंपनी भारतातील स्टॅबक्सचा व्यवसायही पाहते. टाटा समूहाचे म्हणणे आहे की हल्दीरामची वार्षिक उलाढाल १.५ बिलियन आहे. अशा परिस्थितीत १० अब्ज डॉलर्सचे मूल्यांकन थोडे विचित्र आहे.

ही बातमी समोर आल्यानंतर टाटा कंझ्युमरच्या शेअरच्या किमतीत ३ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. टाटा समूह हल्दीराममधील संपूर्ण ५१ टक्के हिस्सा खरेदी करण्यास उत्सुक आहे. जेणेकरून कंपनीकडे निर्णायक अधिकार असतील.

टाटा कंझ्युमरच्या प्रवक्त्याने याबाबत कोणतीही प्रतिक्रिया देण्यास नकार दिला आहे. त्याचवेळी हल्दीरामचे सीईओ कृष्ण कुमार चुटानी आणि खाजगी इक्विटी फर्म बेन कॅपिटल यांनीही काहीही बोलण्यास नकार दिला आहे.

१९३७ मध्ये हल्दीरामची सुरुवात झाली. कंपनीच्या क्रिस्पी भुजियाने लोकांची मने जिंकली होती. हल्दीराम ब्रँड हा कौटुंबिक व्यवसाय आहे. देशभरातील पान शॉपवर ५ रुपयांच्या विक्री पॅकेटपासून ते मोठ्या स्टोअरमध्ये उपलब्ध आहे.

भारताच्या ६.३ अब्ज नमकीन मार्केटमध्ये त्याचा वाटा सुमारे १३ टक्के आहे. पेप्सीच्या 'लेज' ब्रँडच्या चिप्सचाही तेवढाच वाटा आहे. टाटा समूह सध्या असे कोणतेही उत्पादन थेट विकत नाही, त्यामुळे हल्दीराम खरेदी केल्याने टाटा समूहाची थेट बाजारपेठेत पोहोच होईल. त्याचबरोबर रिटेल क्षेत्रातील वेगाने वाढणाऱ्या रिलायन्स रिटेलशी स्पर्धा करण्यासाठीही ही रणनीती उपयुक्त ठरेल.

# शेततळ्यातून साधली समृद्धी..!

औसा तालुक्यातील नांदुर्गा येथे महेश रामचंद्र पाटील यांच्या मालकीची भारी स्वरूपाची एकूण आठ एकर जमीन आहे. ही जमीन सारणी या गावाच्या बाजूला नांदुर्गा शिवारामध्ये येते. सुरुवातीला



त्यांच्याकडे असणाऱ्या एकूण आठ एकर क्षेत्रामध्ये संपूर्णपणे कोरडवाहू पिके घेतली जात होती. यापासून त्यांना जेमतेम उत्पन्न मिळायचे. त्यामुळे शेती मधला खर्च परवडत नव्हता. अनियमित पर्जन्यमान व पिकाला संरक्षित पाणी देण्याची व्यवस्था त्यांच्याकडे नसल्याने उत्पादनामध्ये घट येत होती. यातच त्यांना २०२२ मध्ये राज्य शासनाच्या कृषि विभागामार्फत शेततळ्याच्या योजनेची माहिती मिळाली.

नांदुर्गा हे गाव मंडळ कृषी अधिकारी किल्लारी अधिनस्त येत असल्याने मंडळ कृषि अधिकारी तथा कृषी पर्यवेक्षक आर. डी. रेवशेट्टी व गावचे कृषि सहाय्यक एम.जी. वाघमारे यांनी शेततळ्याची योजना महेश पाटील यांना समजावून सांगितले. तसेच या योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन करून त्यांच्या शेताची पाहणी केली. पीक परिस्थिती बदलून उत्पादनामध्ये वाढ कशा पद्धतीने करता येते, तसेच पिकाचे शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन करून पाणी व्यवस्थापनाच्या माध्यमातून संपूर्ण शेती बागायती खाली कशी आणता येईल, याबद्दल त्यांना माहिती दिली. त्यांच्या एकूण क्षेत्रांमध्ये पूर्वी वर्षाकाठी दोन ते सव्वादोन लाख रुपयेपर्यंत उत्पन्न मिळत होते.

नांदुर्गा हे गाव नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प म्हणजे पोखरामध्ये असल्याने श्री. पाटील यांच्या कागदपत्रांची संपूर्ण छाननी करून त्यांना शेततळ्याचा लाभ मंजूर करण्यात आला. त्यांना अस्तरीकरणासह २५ बाय ३० मीटरचे शेततळे दिले गेले. यासाठी त्यांना सुमारे १ लाख १२ हजार रुपये अनुदान देण्यात आले. त्यांनी शेततळ्याच्या भोवताली कुंपण करून अस्तरीकरण केले व त्यामध्ये त्यांनी पाणी भरून घेतल. चार एकर क्षेत्रावर त्यांनी कोथिंबीर सुरुवातीला घेतली व या कोथिंबीरीचे त्यांना साधारणपणे ४० ते ४५ दिवसांमध्ये सव्वा दोन लाख रुपये मिळाले. त्यानंतर सोयाबीन, हरभरा इत्यादी पिके त्यांनी स्प्रिंकलरच्या माध्यमातून शेततळयामध्ये असणाऱ्या पाण्याद्वारे जगविली त्यातूनही त्यांना वर्षाकाठी साधारणतः चार लाखाच्या आसपास उत्पन्न मिळाले. काही प्रमाणात उसाचेही त्यांनी उत्पादन घेतले.

शेततळयामुळे त्यांच्या शेतीला संरक्षित सिंचनाची सुविधा निर्माण झाली. मुबलक पाणी उपलब्ध असताना श्री. पाटील हे संपूर्ण शेततळे भरून घेतात व संपूर्ण हंगामामध्ये बारमाही पिके जगवतात. सध्या त्यांच्या शेतात पेरूची लागवड करण्यात आली आहे. चार एकर क्षेत्रामध्ये अतिघन पद्धतीने ही लागवड केलेली आहे. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेचा लाभ त्यांनी घेतला आहे. त्यांना यावर्षीपासून एकूण साडेतीन लाख रुपये अनुदान दिले जाणार आहे. तसेच चार एकर क्षेत्राच्या पेरू मधून साधारणतः वर्षाकाठी सहा ते सात लाख रुपये उत्पन्न त्यांना अपेक्षित आहे. या संपूर्ण बागेला त्यांनी ठिबक सिंचनाद्वारे सिंचनाची सुविधा केली आहे.

शेततळयामुळे संरक्षित सिंचनाची सुविधा उपलब्ध झाल्याने महेश रामचंद्र पाटील यांना आर्थिक दृष्ट्या समृद्ध होण्याचा मार्ग गवसला आहेच, पण सोबत शेतीमध्ये विविध प्रयोग करण्यासाठी आधार मिळाल्याचे त्यांच्याशी बोलताना जाणवते.

**- जिल्हा माहिती कार्यालय, लातूर**

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

# आरोग्य

## भारतीयांमध्ये वाढताय हृदयाच्या समस्या

देशात हृदयविकाराच्या समस्या झपाट्याने वाढत आहेत. हृदयाच्या वाढत्या समस्यांमागील कारणे कोणती हे या लेखाच्या माध्यमातून स्पष्ट करण्यात आले आहे. योग्य जीवनशैलीचे पालन करणे आणि आपल्या हृदयाची काळजी घेणे गरजेचे आहे.

२५-७० वयोगटातील व्यक्तींमध्ये सर्रासपणे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी समस्या वाढत असल्याचे दिसून येते. दुर्लक्ष केल्यामुळे किंवा जागरूकतेच्या अभावामुळे अनेकांना जीव गमावत आहेत. दैनंदिन जीवनातील अनेक घटक हृदयाच्या समस्यांचा धोका वाढवू शकतात.त्यामुळे योग्य ती खबरदारी घेतली आणि वेळीच प्रतिबंध केल्यास ऱ्हदयविकाराच्या समस्या टाळता येऊ शकतात.



चूकीची जीवनशैली निवडणे हे भारतीयांमध्ये हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोगास कारणीभूत ठरते. चूकीचा आहार, वाढता ताणतणाव, शारीरिक हालचालींचा अभाव, धूम्रपान आणि मद्यपानासारख्या वाईट सवयींमुळे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोगाचा सामना करावा लागतो. यात्व्यतिरिक्त अनुवांशिकता, वैद्यकिय इतिहास आणि जन्मतः वजन कमी असणे हे देखील हृदयाच्या समस्यांना कारणीभूत ठरते. यामुळे हृदयविकाराचा झटका येणे आणि हृदयविकाराच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. एखाद्याच्या आहारामध्ये कर्बोदकांचा प्रमाण अधिक असणे, ज्यामुळे ओटीपोटात जास्त चरबी जमा होते आणि ते हृदयाच्या आरोग्यासाठी चिंतेची बाब ठरु शकते. ज्यांना मधुमेह आहे अशा व्यक्ती हृदयाच्या समस्यांना कारणीभूत ठरतात. आहाराचा विचार करताना, आपल्या खाद्यपदार्थांमध्ये मीठाचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आरोग्यास धोका असतो. जास्त प्रमाणात मीठाचे सेवन हे उच्च रक्तदाबामागचे मुख्य कारणे आहे, ज्यामुळे हृदयविकाराचा झटका येतो. कामाच्या व्यापामुळे तरुणांमध्ये तणावाचे प्रमाण वाढते आहे, शारीरिक हालचालींचे प्रमाण कमी झाले आहे, परिणामी एकूण फिटनेस पातळी कमी झाली आहे.

**तुमच्या हृदयाच्या आरोग्याचे रक्षण कसे कराल**

एखाद्याचे वय काहीही असो, हृदयविकाराची समस्या उद्भविण्या केवळ वय कारणीभूत नसते. जीवनशैली निवडी, आहाराच्या सवयी, व्यायाम पद्धती आणि तणाव व्यवस्थापन तंत्र यासारखे विविध घटक एखाद्याचा आरोग्यावर लक्षणीय परिणाम करतात. तुमच्या हृदयाच्या आरोग्याची स्थिती जाणून घेण्यासाठी तुम्ही नियमित हृदय तपासणीसाठी करणे गरजेचे आहे. उच्च रक्तदाब, उच्च रक्त शर्करा पातळी किंवा उच्च कोलेस्ट्रॉल असलेल्या व्यक्तींनी त्यासंबंधीत औषधं वगळू नका. नियमित आपल्या डॉक्टरांच्या संपर्कात रहा. तुमच्या हृदयावर ताण येणारी कोणतीही कठोर परिश्रम करणे टाळा. दम लागणे, जास्त घाम येणे किंवा छातीत दुखणे यासारख्या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका, त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या. तुमच्या हृदयाचे आरोग्य हे तुमचे प्रथम प्राधान्य असले पाहिजे.

-डॉ. बिपीनचंद्र भामरे,
मुंबईतील सर एचएन रिलायन्स फाऊंडेशन हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटरचे सल्लागार कार्डियाक सर्जन

## अननस खाल्ल्याने सर्व रोग दूर होतात इतर फायदे जाणून घ्या

अननस चवीला आंबट आणि गोड दोन्ही आहे. त्यात चवीचा एक अनोखा मेळ आहे, जो खाण्यास आनंददायी आहे. आम्ही तुम्हाला सांगतो की हे एक असे फळ आहे जे चवीनुसार अद्वितीय आहे. याशिवाय हे आपल्या आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे. आम्ही तुम्हाला सांगतो की अननसमध्ये अनेक पोषक घटक आढळतात. हे पोषक तत्व केवळ आपल्या शारीरिकच नव्हे तर आपल्या मानसिक आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे.चला तर मग जाणून घ्या.

व्हिटॅमिन सी समृद्ध- अननसमध्ये व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात आढळते. व्हिटॅमिन सी आपल्या शरीराची प्रतिकारशक्ती वाढवते. व्हिटॅमिन सी देखील अँटिऑक्सिडंट्सचा चांगला स्रोत आहे. याचे सेवन केल्याने मुरुम आणि त्वचेशी संबंधित समस्यांपासून आराम मिळू शकतो.

पचन चांगले होणार- अनुनासिक एन्झाइम ब्रोमेलेन अननसात मुबलक प्रमाणात आढळते. हे पचन सुधारण्यासाठी उपयुक्त आहे. त्याचे सेवन केल्याने खाण्याची प्रक्रिया सुलभ होते आणि अन्न सहज पचते. यासोबतच अन्नाचा लाल रंग तोडण्यास मदत होते.

हाडांसाठी फायदेशीर- या फळामध्ये कॅल्शियम आणि मॅग्नेशियम मुबलक प्रमाणात असते. याच्या सेवनाने हाडे मजबूत होतात. अननसात असलेले मॅग्नेशियम मानसिक आरोग्यासाठी खूप चांगले असते.

पचन संस्थाचांगली होते- अननस हे विशेष एन्झाईम्समुळे पचन सुधारण्यास मदत करते. याच्या सेवनाने तुमची पचनक्रिया मजबूत होते.

ग्लुकोज पातळी नियंत्रणात होते- या फळामध्ये फायबरचे प्रमाण चांगले असते. याचे सेवन केल्याने शरीरातील ग्लुकोजची पातळी नियंत्रणात राहते. त्याचबरोबर या फळामुळे मधुमेहाचा धोकाही कमी होतो.




त्वचेची काळजी- अननसमध्ये व्हिटॅमिन सी आढळते. व्हिटॅमिन सी तुमची त्वचा निरोगी आणि चमकदार बनवण्यास मदत करते. याशिवाय, ते कोलेजनच्या निर्मितीला देखील प्रोत्साहन देते. हे त्वचेवरील धूळ आणि घाण काढून टाकण्यास मदत करते.

निरोगी पर्याय- अननस स्वादिष्ट असण्यासोबतच आरोग्याला अनेक प्रकारे फायदेशीर ठरते. अशा परिस्थितीत हे फळ आरोग्यदायी पर्याय ठरू शकते. या फळाचा समावेश तुम्ही तुमच्या आहारात सॅलड, स्मूदी, ताजी फळे किंवा तंदूरी भाजीच्या स्वरूपात करू शकता.

अननसमध्ये असल्या चवीच्या आंबटपणा आणि गोडपणा आणि अनेक पोषक घटक आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहेत. अशा परिस्थितीत तुम्ही या फळाचा आहारात समावेश करू शकता.

## कपालभातीचा सराव पचनासह अनेक शारीरिक समस्यांवर मात करण्यासाठी फायदेशीर



शरीर निरोगी ठेवण्यासाठी योग हा एक फायदेशीर मार्ग आहे. योगासनाच्या नियमित सरावाने शरीर तर निरोगी राहतेच पण मानसिक आरोग्यही चांगले राहते. म्हणजेच योगासन शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर मानले जाते. अनेक प्रकारचे आजार आपल्या शरीरावर आणि मनावर परिणाम करतात. ज्याप्रमाणे वेगवेगळ्या औषधांनी वेगवेगळ्या रोगांपासून मुक्ती मिळते, वेगवेगळी योगासने आपल्याला अनेक रोगांपासून वाचवतात.अनेक आरोग्य लाभांसाठी तर तुम्ही प्राणायाम करू शकता. प्राणायाम शरीरात सकारात्मक ऊर्जा वाढवण्याबरोबरच पचन सुधारते.कपालभाती प्राणायामचा रोजचा सराव किडनी-लिव्हरच्या आरोग्यावरही चांगला परिणाम करतो.कपालभाती प्राणायामचे आरोग्य फायदे जाणून घ्या.

**कपालभाती प्राणायाम कसा करावा?**

कपालभाती करण्यासाठी पद्मासनात बसून दोन्ही हातांनी चित्त मुद्रा करा. दीर्घ श्वास घ्या आणि हळूहळू श्वास सोडा. या दरम्यान पोट आतल्या बाजूला खेचा. जर तुम्ही कपालभाती करायला सुरुवात करत असाल तर फक्त ५-१० मिनिटे सराव करा आणि वेळेनुसार सराव वाढवा.

**कपालभाती प्राणायामाचे फायदे-**

या योगासने केल्याने रक्तातील ऑक्सिजनची पातळी वाढण्यास मदत होते.

श्वासोच्छवासाच्या या योगामुळे फुफ्फुसांची क्षमता वाढते आणि फुफ्फुस मजबूत होतात.

कपालभाती शरीरातील विष आणि इतर टाकाऊ पदार्थ काढून टाकण्यास मदत करते.

कपालभातीचा नियमित सराव पित्ताची पातळी नियंत्रित करण्यासाठी आणि चयापचय दर वाढवण्यासाठी उपयुक्त आहे.


हे योग आसन मेंदूच्या पेशी सक्रिय करण्यासाठी आणि स्मरणशक्ती आणि एकाग्रता शक्ती सुधारण्यासाठी फायदेशीर आहे.

कपालभातीच्या सरावाने चिंता आणि तणाव दूर होतो.

कपालभाती त्वचेला निरोगी आणि चमकदार बनवण्यासाठी देखील फायदेशीर आहे.

या आजारांपासून मुक्ती मिळवण्यासाठी ज्यांना दमा आणि सायनसचा त्रास आहे त्यांच्यासाठी कपालभातीचा नियमित सराव फायदेशीर आहे.

कपालभातीचा सराव पचनसंबंधित समस्या सुधारण्यासह पोटाच्या अनेक समस्या दूर करण्यासाठी फायदेशीर ठरू शकतो.



## शुगरवर कंट्रोल ठेवण्यासाठी हे टाळा

डायबेटिसच्या रुग्णांनी खाण्यापिण्याबाबत विशेष पथ्य पाळणे त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीचे अत्यंत महत्त्वाचे असते. शुगर कंट्रोलमध्ये ठेवण्यासाठी काही गोष्टी आवश्यक असतात. त्यासाठीच या टिप्स -

साखरयुक्त पदार्थ, मध, सरबत, सीरप, कोल्ड ड्रिंक्स, गूळ, तुप, केक, पेस्ट्री, आईसक्रीम, दारू, बीयर आदींचे डायबेटिस झालेल्या रुग्णांनी सेवन करू नये.

ज्या भाज्या जमिनीत येतात, उदा. बटाटे, रताळू, इत्यादी भाज्या खाणे टाळाव्यात.

केली, चीकू, आंबा, सीताफल, द्राक्ष, पपई, पेरू, ऊस आदी फळे वर्ज्य करावीत.

काजू, मनुका, बदाम, भुईमुगांच्या शेंगा, अख्रोड आदी सुकामेवा टाळावा.

मांसाहर टाळावा.

भात, वरण, दूध, पनीर, दही, मासे विचडा आदी पदार्थ कमी प्रमाणात खावेत.

कच्च्या भाज्या उदा. मेथी, पालक, दूधी भोपळा, मुळा, कोथिंबिर, गोभी, चवळी, टमाटर, कांदा, कारले, कांद्याची पात, कैरी, लिंबू पाणी आदी पदार्थ भरपूर प्रमाणात खावे.

**विशेष फायदेशीर**

कारले, कडूलिंब, मेथीदाना यांचा काढा दररोज प्यावा.

सकाळच्या पहरी मोकळ्या हवेत फिरावे.

जास्त तणावात राहू नये.

जागरण कमी करावे.

## केसांना मऊ आणि मजबूत बनवण्यासाठी एवोकॅडो हेअर मास्क वापरा

एवोकॅडो आपल्या शरीरासाठी खूप फायदेशीर आहे. पण तुम्हाला माहिती आहे का की ते केसांसाठीही फायदेशीर आहे. एवोकॅडोमध्ये अनेक पोषक घटक आढळतात. व्हिटॅमिन ए, बी, सी, डी, झिंक, लोह, पोटॅशियम आणि बीटा कॅरोटीन यांसारखे पोषक घटक त्यात आढळतात. एवोकॅडो केसांचे पोषण तर करतेच पण केसांचा कोरडेपणा दूर करण्यासही मदत करते. एवोकॅडो केस गळणे थांबवते आणि केसांच्या वाढीस प्रोत्साहन देते. ते केसांना लावल्याने केस रेशमी आणि चमकदार होतात.

बाजारात अनेक प्रकारचे एवोकॅडो हेअर मास्क उपलब्ध आहेत. पण कधी कधी या प्रकारचे हेअर मास्क केसांना शोभत नाही. त्याच वेळी, त्यांचा वापर केल्याने इच्छित परिणाम मिळत नाही. अशा परिस्थितीत तुम्ही घरच्या घरी एवोकॅडो हेअर मास्क बनवून केसांना लावू शकता. हा मास्क घरी बनवल्याने नैसर्गिक तर होईलच पण केसांशी संबंधित अनेक समस्याही दूर होतील. हा एवोकॅडो मास्क केसांना अंतर्गत पोषण तर करेलच पण कोरड्या केसांच्या समस्येपासूनही आराम देईल. कोरड्या केसांसाठी एवोकॅडो हेअर मास्क कसा बनवायचा ते जाणून घेऊया

**एवोकॅडो आणि नारळ तेल हेअर मास्कचे साहित्य**

पिकलेला एवोकॅडो- १

नारळ तेल - २ चमचे

**असे बनवा हेअर मास्क**



हेअर मास्क बनवण्यासाठी सर्व घटक मिसळून ॲव्होकॅडो आणि खोबरेल तेलाचे मिश्रण तयार करा. हे केस आणि स्कॅल्प वर सुमारे २० मिनिटे लावा. त्यानंतर केस शॅम्पूने धुवा. केसांना पोषण देण्यासोबतच हा मास्क केस गळण्याची समस्या देखील कमी करतो. हा मास्क केसांवर एक थर तयार करतो आणि सूर्याच्या हानिकारक किरणांपासून केसांचे संरक्षण करतो.

**एवोकॅडो आणि मधाचे हेअर मास्कचे साहित्य**

पिकलेला एवोकॅडो - १ टीस्पून

मध - १ टीस्पून

ऑलिव्ह ऑइल - १ टीस्पून

**असे बनवा हेअर मास्क**

एवोकॅडो आणि मधाचा हेअर मास्क बनवण्यासाठी या सर्व गोष्टी एका वाडग्यात चांगले मिसळा. यानंतर, हे मिश्रण केस आणि टाळूवर हलक्या हाताने लावा. २० मिनिटे ठेवल्यानंतर केस सौम्य शाम्पूने धुवा. हा मास्क तुमच्या केसांना नुकसान होण्यापासून वाचवतो आणि कोरड्या केसांच्या समस्येपासून आराम देतो.

**एवोकॅडो आणि एलोवेरा हेअर मास्क-**

पिकलेला एवोकॅडो- १

एलोवेरा जेल- १ टीस्पून

असे बनवा हेअर मास्क

एवोकॅडो आणि एलोवेरा जेल एका भांड्यात चांगले मिसळा. नंतर केसांच्या टोकावर आणि स्कॅल्प वर सुमारे २० मिनिटे लावा. या शैम्पू नंतर. हा हेअर मास्क तुमच्या केसांना पोषण देईल आणि चमकदार करेल.

## सावधान! ५० वर्षांखालील लोकांमध्ये वाढत आहे कॅन्सरचा धोका, जाणून घ्या का?

आजपर्यंतच्या सर्वात मोठ्या कर्करोगाच्या अभ्यासात असे आढळून आले आहे की कर्करोगाने ग्रस्त असलेल्या ५० वर्षांखालील लोकांची संख्या तीन दशकात जवळपास ८०% वाढली आहे. २०३० पर्यंत हा आकडा ३१% ने वाढेल असाही अंदाज आहे. स्कॉटलंडमधील एडिनबर्ग विद्यापीठ आणि हांगझोऊ येथील झेजियांग विद्यापीठाच्या मेडिकल स्कूलने केलेल्या संशोधनातून ही माहिती समोर आली आहे.

संशोधकांनी असा निष्कर्ष काढला की जगभरातील तरुण लोकांमध्ये कर्करोगाच्या रुग्णांची संख्या १९९० मध्ये १.८२ दशलक्ष वरून २०१९ मध्ये ३.२६ दशलक्ष झाली आणि ३० ते ४० वर्षे व त्यापेक्षा कमी वयोगटातील लोकसंख्येमध्ये कर्करोगाच्या मृत्यूमध्ये २७% वाढ झाली.

२०१९ मध्ये, ५० वर्षांखालील लोकांमध्ये कर्करोगाचे सर्वाधिक प्रमाण उत्तर अमेरिका, ओशनिया आणि पश्रि्चम युरोपमध्ये होते. कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्येही हीच परिस्थिती आहे. शिवाय, अशा राज्यांमध्ये कर्करोगाची सुरुवात पुरुषांपेक्षा स्त्रियांवर जास्त परिणाम करते. ओशनिया, पूर्व युरोप आणि मध्य आशियामध्ये उच्च मानवी मृत्यू दर आढळतात.

स्तनाचा कर्करोग, श्र्वासनलिका, फुफ्फुस, पोट आणि आतड्यांचा कर्करोग हे स्त्रियांमध्ये कर्करोगाच्या संशोधकांचे सर्वात सामान्य प्रकार आहेत. किडनी किंवा अंडाशयाचा कर्करोग असलेल्या लोकांमध्ये मृत्यूदरात तीव्र वाढ दिसून आली.

५० वर्षांखालील कर्करोगाच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होण्याचे कारण काय आहे हे संशोधकांना अद्याप पूर्णपणे तपासता आलेले नाही. जर्नल बीएमजे ऑन्कोलॉजीमध्ये, संशोधकांनी सांगितले की खराब आहार, अल्कोहोल आणि निकोटीनचा वापर, शारीरिक निष्क्रियता आणि लठ्ठपणा हे घटक असू शकतात.


तत्पूर्वी, १ सप्टेंबर रोजी, युरोपियन मेडिकल सेंटर (EMC) मधील ऑन्कोलॉजी इन्स्टिट्यूटचे ऑन्कोलॉजिस्ट पावेल कोपोसोव्ह म्हणाले की, जनुकांमध्ये काही उत्परिवर्तन असतात, जे पिढ्यानपिढ्या जातात आणि कर्करोग होण्याची शक्यता वाढवतात.

BRC-1 आणि BRC-2 नावाच्या सर्वात सामान्य उत्परिवर्तनांमुळे स्त्रियांमध्ये स्तन आणि गर्भाशयाचा कर्करोग आणि पुरुषांमध्ये प्रोस्टेट कर्करोगाचा विकास होऊ शकतो. डॉक्टरांनी असेही सांगितले की ट्यूमरचा उशीरा शोध ही मुख्य समस्या आहे, कारण ती बहुतेक वेळा लक्षणांशिवाय विकसित होऊ लागते आणि रोगाच्या शेवटच्या टप्प्यात रोग सुरू होतात.

## तुम्हालाही होतात का तुमच्या पार्श्र्वभागात वेदना? ते आहे या धोकादायक आजाराचे लक्षण

जर तुमचे वय ५० वर्षांपेक्षा कमी असेल आणि हिप दुखण्याची तक्रार असेल, तर ते हलक्यात घेऊ नका. हे एव्हस्कुलर नेक्रोसिस (AVN) रोगाचे लक्षण असू शकते. हा एक धोकादायक आजार आहे, ज्यामध्ये हाडांच्या ऊतींचा मृत्यू होतो. वेळेवर उपचार न मिळाल्यास हाड पूर्णपणे वितळू शकते. कोरोना महामारीपासून -तछ आजाराची प्रकरणे झपाट्याने वाढत आहेत. पूर्वी हा आजार वृद्धांमध्ये दिसून येत होता, परंतु आता केवळ ४० वर्षांपेक्षा कमी वयाचे लोकच या आजाराला बळी पडत आहेत. गेल्या वर्षभरात रुग्णालयांतील अस्थिव्यंग विभागांमध्ये या आजाराने ग्रस्त रुग्णांची संख्या अनेक पटींनी वाढली आहे. एव्हीएनमुळे नितंबांमध्ये वेदना होतात. या आजाराची लक्षणे वेळेवर ओळखणे महत्त्वाचे आहे. उशीर झाल्यास, हिप बदलणे आवश्यक आहे.

असेच एक प्रकरण गुरुग्राममधील मॅक्स हॉस्पिटलमध्ये समोर आले आहे. जिथे एका ३६ वर्षीय रुग्णाच्या नितंबात दुखत होते. सुरुवातीला त्याने या समस्येकडे दुर्लक्ष केले. हळूहळू त्रास वाढू लागला आणि त्याला उठता-बसायला त्रास होऊ लागला. अशा स्थितीत रुग्ण रुग्णालयात आला. त्याला ॲव्हस्कुलर नेक्रोसिस या आजाराने ग्रासल्याचे तपासात समोर आले आहे. त्यामुळे नितंबाची हाडे वितळू शकतात. अशा परिस्थितीत डॉक्टरांनी संपूर्ण हिप रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया करून रुग्णाला नवजीवन दिले आहे.




याबाबत शल्यचिकित्सक सांगतात की, कोरोना महामारीनंतर एव्हीएन आजार लहान वयातच होऊ लागला आहे. एका ३६ वर्षीय व्यक्तीला हा आजार झाला होता, अशी एक केस हॉस्पिटलमध्ये आली आहे. हा एक सामान्य आजार नसून आता त्याचे रुग्ण वाढत आहेत आणि तरुण लोकांमध्ये त्याचे प्रमाण वाढत आहे.

त्याचबरोबर शल्यचिकित्सक असे देखील स्पष्ट करतात की एव्हीएनची समस्या शरीराच्या कोणत्याही भागात उद्भवू शकते, परंतु त्याचा सर्वात जास्त परिणाम हिप आणि गुडघ्याच्या सांध्यावर होतो.

जर एखाद्या व्यक्तीला शरीराच्या या भागांमध्ये सतत वेदना होत असतील तर त्याला हलक्यात घेऊ नका आणि वेदना किती गंभीर आहे, हे जाणून घेण्यासाठी डॉक्टरांचा सल्ला घ्या. अशा वेळी स्वतःहून औषध घेणे टाळावे.

लातूर भूकंप
http://epaper.dainikbhukamp.com
LATUR BHUKAMP
गुरूवार ७ सप्टेंबर २०२३


## 'दिव्यांग कल्याण विभाग, दिव्यांगाच्या दारी' अभियानांतर्गत

'गुगल फॉर्म'मध्ये दिव्यांगांची माहिती सादर करण्याचे आवाहन

लातूर : 'दिव्यांग कल्याण विभाग, दिव्यांगाच्या दारी' या अभियाना अंतर्गत दिव्यांग व्यक्तींच्या नाव नोंदणीसाठी 'गुगल फॉर्म'मध्ये माहिती सादर करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागामार्फत करण्यात आले आहे. दिव्यांग व्यक्तींची माहिती शासन स्तरावरून दिव्यांगाच्या कल्याण व पुनर्वसनाच्या योजनांसाठी आवश्यक आहे. यासाठी लातूर जिल्ह्यातील सर्व दिव्यांग व्यक्तींची नोंदणी https://forms.gle/xCFQQCyZeUBsipTt9 या गुगल लिंक वर भरुन सादर करावी, असे आवाहन जिल्हा परिषदेचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांनी केले आहे.

## कानेगावच्या विद्यार्थिनींनी बनविली 'तंबाखूमुक्त निरामय जीवनाची राखी'

अहमदपूर : रक्षाबंधन हा सण सुरक्षेचे संदेश देण्यासाठी व आचरणात आणण्यासाठी साजरा केला जातो. या रक्षाबंधनाच्या दिवशी सर्वांच्या आरोग्याची काळजी घेत रक्षाबंधन साजरे करण्याचा संकल्प शिरुर आनंतपाळ तालुक्यातील कानेगावच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थिनींनी केला आहे. त्यांनी आपल्या भावाला,वडिलांना व नातेवाईकाला तंबाखू मुक्त निरामय जीवनाची राखी बांधली व तंबाखूमुक्त जीवन जगण्याची प्रार्थना केली.ही संकल्पना शाळेतील राज्यपुरस्कार प्राप्त शिक्षक सुशीलकुमार पांचाळ यांनी विद्यार्थ्यांना सांगितली.ह्या राख्या विद्यार्थींनी टाकाऊ पासून टिकाऊ पद्धतीने तयार केल्या आहेत. तंबाखूमुळे आरोग्याची आणि संपुर्ण आयुष्याची हानी होते. यासाठी जीवनभर तंबाखू आणि नशिले पदार्थांचा सेवन करणार नाही आणि कोणाला करू देणार नाही हा निश्र्चय करणे गरजेचे आहे. जर कोणाला तंबाखू, गुटखा, बिडी किंवा सिगारेट ओढण्याची सवय असेल तर त्या व्यक्तीने रक्षाबंधनाच्या निमित्ताने तंबाखू पासून मुक्त व्हावे. जर तुम्हाला स्वतःला निरोगी ठेवायचे असेल तर कोणत्याही प्रकारच्या तंबाखूच्या सेवनापासून मुक्त असायला हवे. हा यामागील उद्देश असल्याचे सुशीलकुमार पांचाळ यांनी सांगितले.

# महावितरणची विश्वासार्हता वाढविण्यासाठी ग्राहकाभिमुख सेवा द्या-प्रकाश खपले



लातूर दि.६ सप्टेंबर : महावितरण कंपनी प्रति विश्र्वासार्हता वाढवण्यिासाठी ग्राहकाभिमूख सेवा देणे अत्यावश्यक असून त्यासाठी प्राधान्याने ग्राहकसेवा द्या. त्याचबरोबर वीजबील वसुलीच्या कार्यक्षमतेचे प्रमाण कमी झालेल्या भागातील सर्व अधिकाऱ्यांनी संपूर्ण कार्यक्षमतेने वीजबिलाची वसुली करा अन्यथा दंडात्मक कारवाईला सामोरे जा असे निर्देश महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री प्रकाश खपले यांनी दिले.

विद्युत भवन येथे बुधवारी मुख्य अभियंता श्री सुंदर लटपटे, अधीक्षक अभियंता श्री मदन सांगळे, पायाभुत आराखडा विभागाचे अधीक्षक अभियंता श्री अनिल काळे तसेच प्रादेशिक कार्यालयाच्या चाचणी विभागाच्या अधीक्षक अभियंता श्रीमती शुभांगी कटकधोंड, सहाय्यक अभियंता विपूल पिंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत लातूर मंडळातील विविध कामांचा आढावा घेत श्री खपले म्हणाले की, नवीन वीज जोडणी देत असताना कमीत कमी कालावधीत देण्यासाठी प्रयत्न करा. पैसे भरून प्रलंबीत असलेल्या ग्राहकांचे वीज कनेक्शन निकाली काढा. त्याचबरोबर शेतकऱ्यांना अखंडीत वीजपुरवठा व्हावा यादृष्टीने अवैध वीजजोडण्यांची पाहणी करून कायदेशीर कारवाई करा सोबतच वीज गळती कमी करण्याच्या हेतूने आकडे टाकून वीज वापरणाऱ्यांवर वेळोवेळी पथके नेमून कारवाई करण्याचेही आदेश दिले. महावितरणच्या ऑनलाईन सुविधांचा वापर ग्राहकांनी अधिक प्रमाणात करावा यासाठी प्रचार व प्रसिध्दी व्यापक प्रमाणावर करावी, कागद विरहीत पर्यावरणपुरक गोग्रीन सारखी सुविधेचा लाभ घेण्यासाठी प्रत्येक ग्राहकांपर्यंत पोहचा असे निर्देशही श्री प्रकाश खपले यांनी दिले. याप्रसंगी मुख्य अभियंता श्री सुंदर लटपटे यांनीही उपस्थित अधिकाऱ्यांना निर्देश दिले, ते म्हणाले की, शंभर टक्के वीजबील वसुली होणे महावितरणच्या आर्थिक स्थैर्यासाठी अत्यावश्यक असून चालू वीज बिलाच्या मागणी सोबतच थकबाकी वसुलीकडे लक्ष द्यावे. वसुली कमी होण्याचा प्रकार घातक असून तो खपवून घेतला जाणार नाही. संबंधीत अभियंता व अधिकाऱ्यांनी याची दखल घेवून वीजबील वसुलीत सातत्य ठेवावे. शहरी भागातील वसुली ही शंभर टक्के होईल यासाठी प्रयत्नरत रहावे असे आवाहनही त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना केले.

सदरील आढावा बैठकीस लातूर मंडळातील सर्व कार्यकारी अभियंते, उपविभागीय अभियंते, शाखा अभियंते तसेच लेखा विभागाचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास प्रत्येकाने समजून घ्यावा-उमाटे

'शौर्यगाथा मराठवाडा मुक्तिसंग्रामाची' व्याख्यानमाला



लातूर : भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तब्बल तेरा महिने व दोन दिवसांनी आपला मराठवाडा निजामाच्या राजवटीतून मुक्त झाला. मराठवाडा मुक्तीसाठी दिल्या गेलेल्या लढ्याचा जाज्वल्य इतिहास प्रत्येकाने समजून घेणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन इतिहास संशोधक तथा बाबासाहेब परांजपे फाउंडेशनचे सचिव भाऊसाहेब उमाटे यांनी केले.

मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जिल्हा परिषदेचा माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा माहिती कार्यालय व बाबासाहेब परांजपे फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आलमला येथील रामनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजित 'शौर्यगाथा मराठवाडा मुक्तिसंग्रामाची' व्याख्यानमालेत श्री. उमाटे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रामनाथ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. उमेश पाटील तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. बी आर पाटील, शिवाजी अंबुलगे, प्रभाकर कापसे उपस्थित होते .

मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा लढा हा हुकुमशाही विरोधात लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी सामान्य जनतेने दिलेला लोकलढा होता. यात सर्व जनतेने शौर्याने, धैर्याने व प्राणपणाने झुंज दिली. सामान्य जनतेच्या असीम त्यागातून आपणास स्वातंत्र्य मिळाले. निजाम व रझाकार यांच्या अन्यायाविरुद्ध हिंदू महासभा, आर्य समाज तसेच हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या माध्यमातून स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली संस्थानातील जनतेने अभूतपूर्व असा लढा दिला. शेवटी भारत सरकारने पोलीस कारवाई केली. १७ सप्टेंबरला निजाम शरण आला आणि आपल्या संस्थानात मुक्तिची पहाट उगवली, असे श्री. उमाटे यांनी सांगितले.

प्रा. नंदकिशोर धाराशिवे, प्राचार्य कैलास कापसे व श्रीमती जयश्री खराबे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्रभाकर कापसे यांनी केले. डॉ. बी. आर. पाटील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. सूत्रसंचालन पी. सी. पाटील यांनी केले, भास्कर सूर्यवंशी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनिता पाटील, रंगनाथ अंबुलगे, प्रा. पी. के. मुळे, चव्हाण बी. डी. हुरदळे प्रशांत, नरसिंग पंडगे, शरण धाराशिवे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# हैदराबाद मुक्तिसंग्राम हा भारतीय स्वातंत्र्याच्या पूर्णत्वाचा लढा होता-विवेक सौताडेकर

मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृत महोत्सवानिमित्त व्याख्यानमाला



लातूर : आपला भारत देशाचा बहुतांश भाग हा ब्रिटिश राज्यकर्त्यांपासून १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. परंतु भौगोलिक दृष्टीने भारताच्या मध्यभागी असलेले हैदराबाद हे मोठे संस्थान मात्र अद्याप भारतात विलीन झाले नव्हते. यासाठी भारतीय स्वातंत्र्यानंतर तब्बल तेरा महिने दोन दिवस येथील लोकांनी निकराचा लढा दिला. त्यामुळे हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले आणि भारतीय स्वातंत्र्याला खऱ्या अर्थाने पूर्णत्व प्राप्त झाले. त्यामुळे हैदराबादचा स्वातंत्र्यलढा हा प्रादेशिक लढा नसून भारतीय स्वातंत्र्याच्या पूर्णत्वाचा लढा होता, असे प्रतिपादन इतिहास संशोधक विवेक सौताडेकर यांनी केले.

मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा माहिती कार्यालय आणि बाबासाहेब परांजपे फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'शौर्यगाथा मराठवाडा मुक्तिसंग्रामाची' या व्याख्यानमाले अंतर्गत गंगापूर येथील जय किसान विद्यालयामध्ये आयोजित व्याख्यानात श्री. सौताडेकर बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य अशोक बिराजदार होते. व्याख्यानमालेचे तालुका समन्वय दीपक कानगुले, पर्यवेक्षक श्री. कोळी आदी यावेळी उपस्थित होते.

श्री. सौताडेकर पुढे म्हणाले की, हैदराबाद मुक्ती लढ्याचा इतिहास अत्यंत गौरवशाली व दैदिप्यमान आहे. हा मुक्ती लढा म्हणजे जुलमी प्रशासकाच्या विरोधात येथील स्थानिक जनतेने लढलेला लढा असून आजच्या पिढीला समजणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे या लढ्याचा समावेश शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमात स्वतंत्ररित्या झाला पाहिजे. यासाठी विद्यार्थी, शिक्षक आणि स्थानिक व प्रशासनाने पुढे येण्याची गरज आहे, असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोप अशोक बिराजदार यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिपक कानगुले तर आभार प्रदर्शन व सूत्रसंचालन प्रा. लक्षट्टे यांनी केले. व्याख्यानास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिव्यांगासाठी मोफत संगणकीय आणि व्यावसाईक प्रशिक्षणाची संधी

लातूर : शासनाचे दिव्यांग कल्याण आयुक्तालय आणि सांगली जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत मिरज येथील शासकीय प्रौढ दिव्यांग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह ही संस्था प्रौढ दिव्यांगासाठी मोफत प्रशिक्षण देणारी शासकीय संस्था आहे.

या संस्थेतील प्रशिक्षण वर्गांना महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाची मान्यता आहे. या संस्थेला अखिल भारतीय स्तरावरील एफआयसीसीआय अवार्ड १९९९ प्राप्त झाला आहे. या संस्थेत २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी मोफत प्रवेश देणे सुरु आहे. मोजक्याच जागा असल्याने ग्रामीण व शहरी भागातील गरजू दिव्यांग यांनी या संधीचा लाभ घेण्यासाठी त्वरीत संपर्क साधावा, असे आवाहन शासकीय प्रौढ अपंग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृहाचे अधीक्षक यांनी केले आहे.

**दिव्यांगासाठी प्रशिक्षण कालावधी व वयोमर्यादा**

सर्टिफिकेट इन कॉम्प्युटर ऑपरेशन वुईथ एम.एस. ऑफिस (संगणक कोर्स) यासाठी शैक्षणिक पात्रता आठवी पास तर मोटार ॲन्ड आर्मेचर वायडींग, सबमर्सिबल पंप सिंगल फेज (इलेक्ट्रीक कोर्स) साठी किमान नववी पास शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे. १६ वर्षे ते ४० वर्षे वयोमर्यादेतील दिव्यांगांना प्रवेश दिला जाईल. प्रशिक्षण कालावधी एका वर्षाचा राहील.

प्रशिक्षण कालावधीत राहण्याची, जेवणाची व प्रशिक्षणाची मोफत सोय, अद्यावत व परीपूर्ण संगणक कार्यशाळा, भरपूर प्रॅक्टीकल्स व व्यवसायाभिमुख मोफत प्रशिक्षण, इंटरनेटची सुविधा, अनुभवी व तज्ज्ञ निदेशक, उज्वल यशाची परंपरा, समाज कल्याण विभागाकडून स्वयंरोजगारासाठी व्यवसायासाठी बीज भांडवल योजना या सोई व सवलती दिव्यांगाना प्रशिक्षणादरम्यान देण्यात येणार आहेत.

**अर्ज केंव्हा, कसे व कोठे करावा**

प्रवेश अर्ज व माहितीपत्रक अधीक्षक, शासकीय प्रोढ दिव्यांग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह, टाकळी रोड, म्हेत्रे मळा, गोदड मळ्याजवळ, मिरज ता. मिरज जि.सांगली पिन कोड:- ४१६४१० येथे समक्ष मोफत मिळतील. अधिक माहितीसाठी ०२३३-२२२२९०८ या दूरध्वनी क्रमांकावर अथवा ९९२२५७७५६१ किंवा ९५९५६६७९३६ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा. प्रवेशासाठी कोणतीही फी आकारली जाणार नाही. प्रवेश अर्ज पूर्णपणे भरुन फोटोसह संस्थेकडे पाठवावेत किंवा समक्ष भरुन द्यावेत.

प्रवेश अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, एसएससी मार्कशिट व प्रमाणपत्र, दिव्यांगत्व असल्याचे सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र, आधार कार्ड, अधिवास प्रमाणपत्र व उत्पन्नाचा दाखला यांच्या झेरॉक्स प्रती जोडाव्यात. प्रवेश अर्ज संस्थेकडे पाठवावेत. प्रवेश अर्ज प्राप्त झाल्यानंतर तज्ज्ञ समितीद्वारे मुलाखती घेऊन प्रवेश देण्यात येईल, असे शासकीय प्रौढ अपंग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृहाचे अधीक्षक यांनी कळविले आहे.

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरुपती ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३,
मो.९४०४६८२९९९



SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते

## हाफिज जमील अहेमद यांचे निधन



निलंगा : येथील दत्त नगर भागातील मदिना मस्जिद येथील इमाम हाफिज जमील अहेमद रशीदी (५५) यांचे आज दुपारी बारा वाजेच्या दरम्यान केळगाव जवळ लातूर-जाहिराबाद हायवेवर दुचाकीवरून पडून जागीच निधन झाले.

निलंगा शहरातील नामवंत इस्लामिक विद्वान (आलीम) म्हणून ते सर्वप्रचित होते.शहरातील दत्त नगर भागातील मादिना मस्जिद येथे जवळपास २५ वर्षांपासून इमाम म्हणून कार्यरत होते. त्यांच्या पश्चात पत्नी ,तीन मुले,तीन मुली भाऊ असा परिवार आहे.त्यांच्यावर दरगाह हजरत दादापीर येथे रात्री उशिरा दफनविधी करण्यात आली.

**CHANGE IN NAME**

I have change my name SHAIKH HUMERA BEGUM to PATHAN HUMERA SHERKHAN henceforth this declaration and will be known by this name. I will use PATHAN HUMERA SHERKHAN in future. The same name will be used by my husband / wife, children and family .
OLD NAME : SHAIKH HUMERA BEGUM
NEW NAME : PATHAN HUMERA SHERKHAN
ADDRESS : House No. R2/96/4/k Riyaj Colony, Near Riyaj Masjid Latur (M.S.) - 413512

## 'मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेंतर्गत वैयक्तिक शेततळे योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

लातूर : मुख्यमंत्री शाश्र्वत सिंचन योजनेंतर्गत वैयक्तिक शेततळे ही योजना नोव्हेंबर २०२२ पासून राज्यात कृषि विभागामार्फत राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात या योजनेतून आतापर्यंत ४० शेततळे पूर्ण झाले असून सध्याच्या मोठ्या पावसाच्या खंड काळात शेततळ्यामध्ये जमा झालेल्या पाण्याचा खरीप पिके तसेच फळबागाच्या संरक्षित सिंचनासाठी मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. सध्याची टंचाईची परिस्थिती पाहता भविष्यात फळबाग वाचवण्यासाठी सध्या उपलब्ध असलेले विहीर व बोअरवेलचे तसेच परतीच्यापावसाद्वारे उपलब्ध होणारे पाणी अस्तरीकरणासह शेततळे योजनेचा लाभ घेऊन वाचविणे गरजेचे आहे. या योजनेतून अस्तरीकरणाशिवाय शेततळयासाठी ७५ हजार रुपयांपर्यंत व अस्तरीकरणासह शेततळ्यासाठी १ लाख ५० हजार रुपयेपर्यंत अनुदान मिळते. काम पूर्ण झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर हे अनुदान जमा करण्यात येते.

# दुसरे जिल्हा विद्यार्थी मराठी साहित्य संमेलन बाभळगावात

बाभळगाव : विद्यार्थी सहाय्यक मंडळ, लातूर आणि दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव ता. जि. लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने व मराठवाडा अमृत महोत्सवानिमित्त मंगळवार दिनांक २६ सप्टेंबर २०२३ रोजी दुसरे लातूर जिल्हा विद्यार्थी मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

या संमेलनाचे उद्घाटन प्रसिद्ध साहित्यिक तथा ज्येष्ठ विचारवंत डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या हस्ते होत असून यावेळी संमेलन अध्यक्षासोबत संमेलनाचे स्वागताध्यक्ष दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाभळगाव उपाध्यक्ष नरसिंह देशमुख, शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव प्राचार्य डॉ. संजय वाघमारे, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांची उपस्थिती असणार आहे. सभागृहास ना. धों. महानोर साहित्य नगरी असे नाव देण्यात आले आहे.

सकाळी ०८:३० वा.बाभळगाव मधून विद्यार्थी ग्रंथ दिंडीने संमेलनाची सुरुवात होते आहे. पहिल्या सत्रामध्ये ग्रामीण साहित्य स्वरूप आणि प्रेरणा या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले असून अध्यक्षस्थानी ४२ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शेषराव मोहिते तर मार्गदर्शक म्हणून शहीद भगतसिंग महाविद्यालय, किल्लारी येथील डॉ. ज्ञानदेव राऊत यांची उपस्थिती असणार आहे. दुसऱ्या सत्रामध्ये विद्यार्थी प्रतिनिधी साहित्यिकांचे कथाकथन व कवी संमेलन होणार आहे.

तिसऱ्या सत्रात दलित साहित्य स्वरूप आणि प्रेरणा या विषयावर परिसंवाद आयोजित केला आहे. यावेळी अध्यक्षस्थानी मराठवाडा साहित्य परिषद शाखा, लातूर अध्यक्ष डॉ. जयद्रथ जाधव तर मार्गदर्शक डॉ. अशोक नारनवरे मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय, औराद शहाजनी यांची उपस्थिती राहणार आहे.

या संमेलनाचा समारोप समारंभ आणि प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार असून अतिथी म्हणून ज्येष्ठ साहित्यिक कवी फ.म. शहाजिंदे, मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, प्राचार्य डॉ. नागनाथ मोटे यांची उपस्थिती राहणार आहे.

या साहित्य संमेलनाचा लाभ घेण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, समन्वयक मराठी विभाग प्रमुख डॉ. जयदेवी पवार, डॉ.रणजीत जाधव, विद्यार्थी सहाय्यक मंडळाचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांच्यासह संयोजन समितीतील सर्व सदस्य, महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी प्रतिनिधी यांनी केले आहे.